राजकुंवर बहुउद्देशिय सेवाभावी संस्था,जालना संचलित

# शिवराज कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय

पिंपळगांव (कोलते), ता.भोकरदन, जि.जालना

Email ID : shivrajcollegepimpalgaonkolte@gmail.com

कॉलेज कोड : ८५६

IN PURSUIT OF EXCELLENCE

स्थापना : जुलै २००९


# माहिती पुस्तिका

# PROSPECTUS

संलग्नता : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

Scanned with CamScanner

✻ आमचे प्रेरणा स्थान ✻



संस्थापक अध्यक्ष

**प्रा.डॉ. भगवानसिंग डोभाळ**

एम.एस्सी.पीएच.डी.

(रसायनशास्त्र संशोधक मार्गदर्शक)

# SHIVRAJ Jr. & Sr. COLLEGE ,PIMPALGAON (KOLTE)

Tq. Bhokardan Dist, Jalna

## MISSION

*Shivraj college is commited to the Mission of the Parent Body - " In Pursuit Of Excellence". The college has fullfaith in its "Mission" which will be produecing intelligent, Noble, Tolerant, Confident, Courageous, Self-Realiant student who may prove themselves to be good, healthy, resopnsiable citizens of India.*

## GOALS

1) To provide the educational facilities to the students of rural area with minimum cost.
2) To import career oriented education to the students.
3) To give business-oriented education to the students.
4) To give the education for the overall personality development of the students.
5) To guide the students to get success in the competitive examinations.
6) To create the social responsibility among the students.
7) To provide good education for the educationally and economially disadvanteged students.



Scanned with CamScanner

अध्यक्षांचे मनोगत :-

अभिनंदन ..! अभिनंदन ..! अभिनंदन ..!

विद्यार्थी मित्रांनो आपण मिळवलेल्या यशाबद्दल आपले हार्दिक अभिनंदन शिवराज कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेऊ ईच्छिणाऱ्या प्रत्येक विद्यार्थी मित्राचे आम्ही स्वागतच करतो.

पिंपळगांव (कोलते) व परिसर नेहमीच शिक्षणाच्या बाबतीत उपेक्षीत व शिक्षणापासुन वंचित राहिलेला आहे. अशा परिसरात शिक्षणाची/शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी तसेच येथील शिक्षणाच्या बाबतीत उपेक्षित व शिक्षणापासुन वंचित असणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे यासाठी राजकुंवर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व मी या परिसरात शैं.वर्ष २००९-१० मध्ये शिवराज कनिष्ठ महाविद्यालय, पिंपळगांव (कोलते) च्या स्वरूपात उच्च माध्यमिक शिक्षणाची सुविधा करून दिली.

पिंपळगांव (कोलते) व परिसरात माध्यमिक शिक्षणानंतर विद्यार्थ्यांना पुढील पदवी शिक्षणासाठी जवळपास परिसरात कुठलीही शिक्षणाची सुविधा नव्हती. अशा विद्यार्थ्यांना पदवी शिक्षणासाठी शहराच्या ठिकाणी जावे लागत होते. परंतू बऱ्याचजणांची आर्थिक परिस्थिती बिकट/हलाकिची असल्या कारणाने शहराच्या ठिकाणी जाऊन ते शिक्षण घेऊ शकत नाहीत परिणामी ते शिक्षणापासुन वंचित राहतात.

पिंपळगांव (कोलते) सारख्या डोंगराळ व ग्रामीण भागात शिवराज वरिष्ठ महाविद्यालय च्या स्वरूपात शिक्षणाची नवसंजीवनी राजकुंवर बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेने निर्माण केली. या वरिष्ठ महाविद्यालयात कला, वाणिज्य व विज्ञान तिन्ही शाखा उपलब्ध असल्याकारणाने परिसरातील विद्यार्थी विविध शाखेत प्रवेश घेऊन आपले शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करत आहेत व विविध क्षेत्रात नावलौंकिक मिळवत आहेत.

संस्थापक अध्यक्ष
**प्रा. डॉ. भगवानसिंग डोभाळ**



# शिवराज कनिष्ठ महाविद्यालय, पिंपळगांव (कोलते)

## ता. भोकरदन, जि.जालना

**विद्या शाखा व अभ्यासक्रमाचे विषय**

## अकरावी कला शाखा (माध्यम : मराठी)

| | | |
|---|---|---|
| अनिवार्य विषय | : | इंग्रजी व पर्यावरण शिक्षण |
| व्दितीय भाषा | : | मराठी/हिंदी |
| ऐच्छिक विषय | : | १) इतिहास |
| | | २) राज्यशास्त्र |
| | | ३) समाजशास्त्र |
| | | ४) अर्थशास्त्र |
| | | ५) मानसशास्त्र/भुगोल |

अकरावी कला शाखेत निवडलेले विषय बारावीत अभ्यासावे लागतात.

## अकरावी विज्ञान शाखा (माध्यम : मराठी)

| | | |
|---|---|---|
| अनिवार्य विषय | : | इंग्रजी व पर्यावरण शिक्षण |
| व्दितीय भाषा | : | मराठी/हिंदी |
| ऐच्छिक विषय | : | १) भौतीकशास्त्र (Physics) |
| | | २) रसायनशास्त्र (Chemistry) |
| | | खालीलपैकी कोणतेही दोन विषय |
| | | अ) जीवशास्त्र (Biology) |
| | | ब) गणित (Mathematics) |
| | | क) मानसशास्त्र (Psychology) / भुगोल (Geography) |
| | | ड) इलेक्ट्रॉनीक्स (Electronics) |

अकरावी विज्ञान शाखेत निवडलेले विषय बारावीत अभ्यासावे लागतात.



Scanned with CamScanner

## शिवराज वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळगांव (कोलते)

### अभ्यासक्रम कसा निवडावा

१२ वी नंतर जेंव्हा आपण महाविद्यालयात प्रवेश घेतो,त्यावेळी बहुसंख्य विद्यार्थ्या समोर प्रश्न निर्माण होतो की, कोणती ज्ञानशाखा निवडावी ? पालकांसमोरही हाच प्रश्न पडतो. ज्यांचे शिक्षणाचे उद्दिष्टे स्पष्ट असते, अशा विद्यार्थ्यांना हा प्रश्न पडत नाही. पुढे आपल्याला काय व्हायचं, हे निश्चित केले तर विद्याशाखेची निवड सहज करता येते.

जो अभ्यासक्रम आपण निवडणार, तो आपण का शिकला पाहिजे ? तो शिकल्यामुळे आपल्याला नेमका कोणता उपयोग होणार आहे. त्यातून आपणास कोणती नोकरी मिळु शकेल , अथवा कोणता व्यवसाय करता येईल. कोणता आर्थिक फायदा होइल याची माहिती करून घेतली पाहिजे. तसेच आपल्या आवडीचा विषय कोणता आहे, कोणती शाखा आवडते, कोणत्या अभ्यासक्रमात आपण प्रगती करु शकतो किंवा आपल्या मर्यादा काय आहे हेही लक्षात घेतले पाहिजे.

अभ्यासक्रमाची निवड करताना आपली बौध्दिक पातळी आवड महत्वाची आहे. पालकाच्या इच्छेमुळे, मित्राच्या आग्रहामुळे किंवा मैत्रिणीच्या सोबतीमुळे आपणास नको असलेल्या अभ्यासक्रमाची निवड करू नये. विद्यार्थ्यांनी स्वतः च्या बौध्दिक पात्रतेनुसार अभ्यासक्रमाची निवड केली तर ते त्यात अधिक प्रगती करु शकतात. कोणती विद्याशाखा निवडल्यास आपल्याला कोणत्या व्यावसायिक संधी निर्माण होतात हे पुढिल प्रमाणे सांगता येईल.

### वाणिज्य शाखे नंतर संधी

| | |
|---|---|
| १) सी.ए. (चार्टड अकाऊटंट) | २) आय.सी.डब्ल्यु.ए. |
| ३) सी.एस. (कंपनी सेक्रेटरी) | ४) एम.कॉम. |
| ५) एम.बी.ए. | ६) एम.ए. अर्थशास्त्र |
| ७) एल.एल.बी. | ८) कॉम्प्युटर प्रोग्रामिंग |
| ९) कॉम्प्युटर अकॉंटंट | १०) एम.सी.एम. |
| ११) जी.डी.सी. अँण्ड ए. | १२) बी.लीब. / एम.लीब. |



### कला शाखे नंतर संधी

| | |
|---|---|
| १) एम.ए. | २) एम.बी.ए. |
| ३) बी.एड्. / बी.पी.एड्. | ४) बी.लीब. / एम.लीब. |
| ५) एल.एल.बी. | ६) एम.एस. डब्ल्यू. |
| ७) कॉम्प्युटर प्रोग्रामिंग | ८) डिप्लोमा इन हॉटेल मॅनेजमेंट |
| ९) बी.जे. / एम.जे. | |

### विज्ञान शाखे नंतर संधी

| | |
|---|---|
| १) एम.एस्सी. | २) एम.बी.ए. |
| ३) बी.एड्. | ४) बी.लीब. / एम.लीब. |
| ५) एल.एल.बी. | ६) डिप्लोमा इन हॉटेल मॅनेजमेंट |

या तीनही शाखेचे महत्व सारखेच असुन वरील तीनही शाखेतील पदवीधरांना एम.पी.एस.सी./यु.पी.एस.सी./आय.ए.एस./आय.पी.एस., स्टाफ सिलेक्शन, बँकिंग व विविध स्पर्धा परिक्षा देता येतात.

### प्रवेशसाठी

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद अंतर्गत विद्याशाखा व अभ्यासक्रमाचे विषय**

**महाविद्यालयात बी.ए.,बी.कॉम.,बी.एस्सी, या अभ्यासक्रमाच्या शिक्षणाची सोय आहे.**

### कला विद्याशाखा

## बी.ए. प्रथम वर्ष

**प्रवेश पात्रता : इयत्ता १२ वी कला/वाणिज्य/विज्ञान शाखा उत्तीर्ण**

अनिवार्य विषय : १) इंग्रजी आवश्यक

२) व्दितिय भाषा :- मराठी/हिंदी/पाली/संस्कृत/उर्दु

ऐच्छिक विषय : (खालील ऐच्छिक विषयाच्या गटातुन प्रत्येक एक या प्रमाणे तीन विषय निवडता येतील.)

गट (अ) : मराठी/हिंदी/इंग्रजी

गट (ब) : भुगोल/मानसशास्त्र/शा.शिक्षण

गट (क) : समाजशास्त्र/राज्यशास्त्र

गट (ड) : इतिहास

गट (इ) : अर्थशास्त्र/लोकप्रशासन



Scanned with CamScanner

## वाणिज्य विद्याशाखा

### बी.कॉम. प्रथम वर्ष

**प्रवेश पात्रता : इयत्ता १२ वी कला/वाणिज्य/विज्ञान शाखा उत्तीर्ण**

प्रथम सेमिस्टर

1) English
2) **Second Language:-** Marathi/Hindi/English
3) Information Technology -I
4) Business Environment
5) Business Economics
6) Business Statistics
7) Business Financial A/c-I

द्वितीय सेमिस्टर

1) English
2) **Second Language :-** Marathi/Hindi
3) Information Technology-III
4) Entrepreneurship Development
5) Industrial Economics
6) Fundamental Regulatory Framework
7) Financial Accounting - II

### बी.कॉम. द्वितीय वर्ष

तृतिय सेमिस्टर

**Compulsory Subject**

1) English
2) **Second Language :-** Marathi/Hindi
3) Information Technology-III
4) Principles Of Business Mgt.
5) Corporate Accounting- I
6) Business Regulatory Framework

**Optional Subject** (Any one Paper)

1) Marketing Management
2) Financial Management
3) Human Resource Management

चौथे सेमिस्टर

1) English
2) **Second Language :-** Marathi/Hindi
3) Information Technology-IV
4) Organizational Behaviour
5) Corporate Accounting- II
6) Corporate Legal Framework

**Optional Subject** (Any one Paper)

1) Marketing Management
2) Financial Management
3) Human Resource Management



### बी.कॉम. तृतीय वर्ष

पाचवे सेमिस्टर

**Compulsory Subject**

1) English
2) **Second Language :-** Marathi/Hindi
3) Information Technology-V
4) Cost Accounting- I
5) Auditing Concepts
6) Auditing Concepts
7) Direct Taxes
8) Management Accounting I
9) Field Work

**Optional Subject** (Any one Paper)

1) Small Busi. Management 2) Insurance 3) Co-operation.

सहावे सेमिस्टर

**Compulsory Subject**

1) English
2) **Second Language :-** Marathi/Hindi
3) Information Technology-VI
4) Cost Accounting- II
5) New Auditing Trends
6) Indirect Taxes
7) Management Accounting II
8) Report & Presentation Based on Field Work

**Optional Subject** (Any one Paper)

1) Retail Management 2) Banking 3) Rural Development

## विज्ञान विद्याशाखा

### बी.एस्सी. प्रथम वर्ष

**प्रवेश पात्रता : इयत्ता १२ वी विज्ञान शाखा उत्तीर्ण असलेले विद्यार्थी सदरील अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ शकतात.**

या अभ्यासक्रमाचे माध्यम इंग्रजी असून प्रवेशासाठी खालील विषयांचे गट करण्यात आले आहेत. प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना यापैकी एक विषय गट निवडावा लागेल. बी.एस्सी. भाग १ साठी विद्यार्थ्यांने जो विषय गट निवडला असेल तोच विषय गट त्याला बी.एस्सी. भाग २ आणि बी.एस्सी. भाग ३ साठी घ्यावा लागेल. बी.एस्सी प्रथम व द्वितीय वर्षासाठी इंग्रजी (अनिवार्य) आणि एक द्वितीय भाषा निवडावी लागेल.



Scanned with CamScanner

## ✻ अनिवार्य विषय ✻

१) इंग्रजी आवश्यक २) व्दितीय भाषा : मराठी / हिंदी.

## ऐच्छिक विषय : (कोणताही एक ग्रुप)

| Sr. No. | Subject / Group |
|---|---|
| 1. | Chemistry - Botany - Zoology |
| 2. | Chemistry - Physics - Math |
| 3. | Chemistry - Physics - Electronics |
| 4. | Physics - Maths - Computer Science |
| 5. | Physics - Maths - Electronics |
| 6. | Maths - Electronics - Computer Science |
| 7. | Chemistry - Botany - Micro Biology |

✻ टिप : बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. प्रथम वर्षाला घेतलेल ऐच्छिक विषय व्दितीय व तृतिय वर्षाला कायम असतील. तसेच प्रथम वर्षाला संगणकशास्त्र अनिवार्य कोर्स व व्दितीय वर्षाला पर्यावरणशास्त्र अनिवार्य कोर्स आवश्यक असेल. (परिक्षा पध्दती व फीस विद्यापीठाच्या नियमांनुसार राहील.)

## शुल्क व निधी (Fees & Deposits)

**विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे शिक्षण शुल्क व इतर शुल्क राहिल.**

## प्रवेशासंबंधीच्या विशेष महत्वाच्या सूचना

१) महाविद्यालयाच्या प्रत्येक वर्गाची अपेक्षित प्रवेशसंख्या शासकिय नियमाप्रमाणे निर्धारित करण्यात आली आहे. म्हणुन प्रवेश घेवु इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर प्रवेश घेणे आवश्यक आहे.

२) प्रवेशाची संख्या , त्यासबंधीचे आरक्षण, प्रवेश पात्रता, त्यासाठी भरावे लागणारे शुल्क, सोबत जोडावी लागणारी कागदपत्रे, याबाबतीत विद्यापिठाच्या आणि शासनाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल.

३) प्रवेशासाठी निर्धारीत केलेले विहित नमुन्यातील आवेदनपत्र पुर्ण आणि सुवाच्च हस्ताक्षरात भरलेला असावे.

४) अपुर्ण भरलेले, चुकिची किंवा विसंगत माहिती असलेले, विद्यार्थ्यांचे छायाचित्र नसलेले आवेदन पत्र प्रवेशासाठी विचारात घेतले जाणार नाही

५) महाविद्यालयाने दिलेल्या प्रवेशास विद्यापिठ यांची अंतिम मान्यता मिळणे आवश्यक असते. काही कारणास्तव त्याची मान्यता मिळाली नाही तर सबंधित विद्यार्थ्याचा प्रवेश रद्द होऊ शकतो. अशाप्रकारे प्रवेश रद्द झाल्यास त्याला महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

६) विद्यापिठ नामांकनासाठी प्रथम वर्गात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी त्याची मुळ गुणपत्रिका (सर्व प्रयत्नांच्या गुणपत्रिकासह) प्रवेश अर्जासोबत देणे आवश्यक आहे.

७) या महाविद्यालयाच्या नियमित विद्यार्थ्यांनी पुढिल वर्गात प्रवेश घेण्यासाठिपात्रता परिक्षा उत्तीर्ण केल्यानंतर म्हणजे विद्यापिठाच्या परीक्षांचा निकाल जाहीर झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत प्रवेश घावा. त्यानंतर प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेशाची हमी देता येणार नाही.

८) महाविद्यालयाच्या प्रथमच पदवी अभ्यासक्रमाकरीता प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालय सोडल्याचा मुळ दाखला तसेच एच.एस.सी. ची गुणपत्रिका ( दोन प्रमाणित सत्यप्रतींसह) आवेदनपत्रासोबत कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे.

९) महाविद्यालयात प्रवेश घेऊ ईच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी सोबत दिलेल्या तक्त्याप्रमाणे आवश्यकतेनुसार विशिष्ट कालावीत निर्धारित शुल्क भरणे बंधणकारक आहे. त्यामध्ये कोणत्याही कारणास्तव वेगळी सुट किंवा सवलत मिळणार नाही.



Scanned with CamScanner

१०) एकदा प्रवेश घेतल्यानंतर कोणत्याही कारणामुळे महाविद्यालय सोडावयाचे असल्यास प्रवेशासाठी भरलेले शुल्क परत मिळणार नाही.

११) प्रवेश समितीच्या शिफारशीवरून जागा उपलब्ध असल्यास, कार्यालयीन बाबींची पुर्तता केल्यानंतर ए.टी.के.टी. च्या सवलतीनुसार, पास झालेल्या विद्यार्थ्यांना वरच्या वर्गात प्रवेश मिळू शकेल.

१२) वेगवेगळ्या खेळ आणि वैयक्तिक स्पर्धा यामध्ये विशेष किंवा नैपुण्य प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना त्यात वाव म्हणजे त्यांना इच्छा असलेल्या वरच्या वर्गामध्ये प्रवेशासाठी प्राधान्य दिले जाईल

१३) विशिष्ट परिस्थितीत प्रवेश समिती च्या शिफारशीनुसार प्राचार्यांना कोणत्याही विद्यार्थ्यांचा प्रवेश नाकारण्याचा अधिकार राहील.

## प्रवेश अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे

अ) विद्यालय अथवा महाविद्यालय सोडल्याचे मुळ प्रमाणपत्र व सोबत तिची प्रमाणित (Attested) तीन प्रत.

ब) एच.एस.सी. ची मुळ गुणपत्रिका व सोबत तिची प्रमाणित (Attested) तीन प्रत.

क) एच.एस.सी. ची गुणपत्रिका व टी.सी. ची प्रमाणित (Attested) तीन प्रत.

ड) चार कलर फोटो इ) आधार कार्ड

## मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी ( GOI / Freeship )

मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी जातीच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत, मागील वर्षाचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र, जी.ओ.आय. ( Satisfaction no ) , खंड प्रमाणपत्र ( Gap Certificate ) ची प्रत जोडणे अनिवार्य आहे. राष्ट्रीयकृत बँकेच्या पासबुक/आधार कार्ड बँकेत लिंकची झेरॉक्स केल्याची पावती अन्यथा पूर्ण फी भरावी लागेल.



## प्रवेश प्रक्रिया

- बारावी आणि विद्यापीठाच्या परीक्षांचे निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधीत वर्गामध्ये प्रवेश देण्याची प्रक्रिया लगेच सुरु करण्यात येईल.

- प्रवेश घेताना विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन मिळावे, म्हणुन महाविद्यालयाने प्रवेश समितीची स्थापना केली आहे. ही प्रवेश समिती त्या कालावधीत आपल्या कार्यालयात विशिष्ट वेळेत उपस्थित राहणार आहे. विद्यार्थ्यांनी प्रवेशासंदर्भात काही अडचण असतील तर प्रवेश समितीशी संपर्क साधावा.

- प्रथम येणाऱ्यास प्रथम प्रवेश, जागा शिल्लक असे पर्यंत प्रवेश, क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश दिले जाणार नाही.

## परिक्षा पध्दती

- बी.ए /बी.एस्सी/बी.कॉम/व्दितिय/तृतिय वर्गाच्या आणि एम.ए./एम.एस्सी/ एम.कॉम वर्गाच्या परिक्षा विद्यापिठाच्या नियमानुसार सेमिस्टर पध्दतीने घेण्यात येतिल. वर्षातुन दोन वेळेस परिक्षा असेल.

- परिक्षा फिस : परिक्षा फिस / लेट फिस विद्यापिठाच्या नियमानुसार प्रती सेमिस्टर आकारली जाईल

## महाविद्यालयीन अंतर्गत परिक्षा

महाविद्यालयाच्या स्तरावर प्रति सेमिस्टर किमान दोन घटक चाचण्या व ट्युटोरियल घेण्यात येतिल. त्यासाठी आवश्यक फीस नियमाप्रमाणे आकारली जाईल.

## गणवेश (Uniform for Students)

महाविद्यालयातील सर्व वर्गाच्या सर्व विद्यार्थी- विद्यार्थीनींना कॉलेजमध्ये येताना गणवेशात येणे सक्तिचे आहे.

<u>विद्यार्थ्यांसाठी :</u> कार्बन ब्लॅक रंगाची फुल जिन्स पॅन्ट आणि क्रीम रंगाचा फुल शर्ट (पुर्ण बाह्यांचे )
<u>विद्यार्थीनींसाठी :</u> पुर्ण बाह्यांचा (टु थर्ड स्लीव्हस्) क्रीम रंगाचा कुर्ता आणी कार्बन ब्लॅक सलवार (कुर्ता राऊंड नेक, मिडियम कट आणि पंजाबी सुट असलेला)ओढणी (कार्बन ब्लॅक).
<u>दुर गुलवारी विद्यार्थी-</u> विद्यार्थीनींसाठी गणवशाचे बंधन राहणार नाही.



Scanned with CamScanner

## ग्रंथालय (Library)

८) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या शिस्तीचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांची प्राध्यापकांशी व महाविद्यालयातील इतर व्यक्तीशी आदरपुर्वक वागणुक असावी. विद्यार्थ्यांनी आपसातील संभाषणात व वर्तवणुकीबद्दल विद्यार्थ्यांना कडक शिक्षा केली जाईल. आणि प्रसंगी महाविद्यालयातुन काढुन टाकले जाईल.

९) वर्गात अथवा महाविद्यालयाच्या परिसरात मोबाईल बंद ठेवणे अनिवार्य आहे

१०) तास सुरु होण्यापुर्वी सर्व विद्यार्थ्यांनी आपआपल्या वर्गात स्थानापन्न होणे.आवश्यक आहे. तास नसल्यास रिकामा वेळ वाचनालयात घालवावा.कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही कारणाकरिता चालु असलेला वर्ग व महाविद्यालयाचे इतर कामकाज यात विद्यार्थ्यांनी अडथळा आणु नये.

११) महाविद्यालयाच्या सर्व पाठ, सहवर्ता, कार्यक्रमात, व खेळात विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे ही अपेक्षा असते. आणि अशा प्रसंगी विद्यार्थ्यांची शिस्तपुर्ण वागणुक आवश्यक असते.

१२) प्राचार्याच्या परवाननीशिवाय महाविद्यालयाच्या परिसरात जाहिराती व सुचना फलके लावता येणार नाही.

१३) कोणत्याही विद्यार्थी-विद्यार्थीनींस महाविद्यालयात पालकां व्यतिरिक्त दुसऱ्या व्यक्तिला आणता येणार नाही.

१४) <u>प्रत्येक विद्यार्थांनी रोज महाविद्यालयात सूचनाफलक वाचावयास पाहिजे.</u>

१५) महाविद्यालयात घेण्यात येणाऱ्या प्रत्येक परीक्षेला विद्यार्थी उपस्थित असणे आवश्यक आहे. जे विद्यार्थी महाविद्यालयातील परिक्षांना गैरहजर असतील त्यांना प्रत्येकी रू ४०/- दंड केला जाईल व गैरहजर आणि सतत अनुत्तिर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना बोर्ड व विद्यापिठाच्या परीक्षेला अपात्र ठरवले जावु शकते.



१६) विद्यार्थ्यांने वेळापत्रकानुसार वर्गात हजर राहावयास पाहिजे. वर्गात ग्रंथालयात, प्रयोग ,शाळेत व महाविद्यालयाच्या आवारात इतर ठिकाणी महाविद्यालयाचे जे सामान,फर्निचर, ग्रंथ , वर्तमानपत्र , प्रयोगशाळेचे सामान, खेळाचे सामान इत्यादी दिले जाते. त्याची कोणतीही नासधुस झाली तर त्याची पुर्ण नुकसानभरपाई विद्यार्थ्याकडुन करुण घेतली जाईल.महाविद्यालयाविषयी कोणत्याही प्रकारची माहिती प्राचार्याच्या परवानगिशिवाय वर्तमानपत्रात देऊ नये.

१७) वर्ग सुरु असताना विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या व्हरांड्यात फिरु नये.

१८) विद्यार्थ्यांने महाविद्यालयाचे अधिकारी, प्राध्यापक, विद्यार्थी, कर्मचाऱ्यांशी स्वतःची वागणुक सौंजन्यशील ठेवावी. कोणताही विद्यार्थी महाविद्यालयाच्या आवारात सौंजन्याने वागत नसेल तर त्याचे नाव महाविद्यलयातुन ताबडतोब कमी केले जाइल. प्राचार्यांच्या परवानगीशिवाय कॉलेज परिसरात कोणतेही कार्यक्रम आयोजित करता येणार नाही.

१९) महाराष्ट्र शासनाने रॅगिंग सबंधी कायदा संमत केलेला आहे. तरी विद्यार्थ्यांनी कायद्याचे उल्लघन होणार नाही. याची दक्षता घ्यावी.

२०) विद्यार्थ्यांने महाविद्यालयाचे कोणताही दाखला मिळू शकणार नाही. इतकेच नव्हे तर ज्यांना विद्यापिठाच्या परीक्षेस बसण्याची परवानगी दिली जाणार नाही.



Scanned with CamScanner

## मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या भारत सरकारच्या शिष्यवृत्या.

१) शिष्यवृत्तीसाठी अर्ज करु इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी संबंधित फॉर्म्स मधील सर्व महिती सुवाच्च अक्षरात, पुर्णपणे भरुन दिलेल्या वेळेत महाविद्यालयात सादर करावेत.

२) शिष्यवृत्तीच्या अर्जामध्ये नोदंवलेली जात आणि संबंधित शाळेच्या दाखल्यावर नमुद केलेली जात यामध्ये तफावत असल्यास सदर अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

३) पुर्णवेळ नोकरी करणाऱ्या विद्यार्थ्याला शिष्यवत्ती मिळत नाही. ही अट विचारात घेऊन नोकरी करणाऱ्या किंवा शिकत असताना नोकरीवर लागलेल्या विद्यार्थ्यांनी तसे महाविद्यालयाच्या कार्यालयाला तत्परतेने कळवले पाहिजे

४) एका कुटुंबातील फक्त दोन अपत्यांनाच शिष्यवृत्ती घेता येते

५) शिष्यवृत्ती घेणाऱ्या विद्यार्थ्यांनै राष्ट्रिय कृत बँकेच्या शाखेत खाते उघडणे आवश्यक आहे.

६) बाहेरच्या जिल्ह्यातून शिष्यवृत्ती घेऊन या महाविद्यालयात पुढिल शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना तेथिल जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्याचे जिल्हाबदल प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

७) विद्यार्थ्याच्या शिक्षणामध्ये खंड पडलेला असल्यास विद्यार्थ्यांने आपल्या शिष्यवत्तीच्या अर्जासोबत संबंधित कालखंडामध्ये शिष्यवृत्ती मिळाली नसल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

८) विद्यापिठ परीक्षा ऊत्तीर्ण होऊन विद्यार्थ्याने महाविद्यालयातुन दुसऱ्या महाविद्यालयात पुढिल वर्गासाठी प्रवेश घेतल्यास समाजकल्याण अधिकाऱ्याची परवानगी घेणे आवश्यक आहे. त्या शिवाय त्याच्या अर्जाचा शिष्यवृत्तीसाठी विचार केला जाणार नाही.

९) शिष्यवत्तीधारक विद्यार्थ्यांची व्याख्यानाना / प्रात्याक्षिकांना / रा.से.यो./ राष्ट्रिय छात्र सेना / शारीरीक शिक्षण उपक्रमांना किमान ७५% उपस्थिती असणे बंधणकारक आहे. यापेक्षा कमी उपस्थिती असणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनाच्या नियमानुसार शिष्यवृत्ती मिळणार नाही.



# राजकुंवर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था,जालना

डी-जी-१, पार्वती अपार्टमेंट, तळ मजला, एम.एस.ई.बी. रोड, मस्तगड,जालना - ४३१ २०३

अध्यक्ष
प्रा.डॉ. भगवानसिंग डोभाळ

सचिव
प्रा.डॉ. संगिता राजपूत

## * राजकुंवर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, जालना संचलित शाळा व महाविद्यालये *

### वरिष्ठ महाविद्यालये

१. राजकुंवर महाविद्यालय, जालना, जि. जालना.
(B.A./B.Com/B.Sc.(Comp.Sci)/B.B.A./B.C.A./M.Sc.(Comp.Sci.)/M.Com.,M.Sc. (Math) (Y.C.M.O.U)
२. राजकुंवर महाविद्यालय, धावडा, ता.भोकरदन, जि. जालना.
(B.A./B.Com/B.Sc./M.Com/M.Sc. (Comp.Sci) / M.A.(Politicl Sci.)) B.A./B.A.(Pre.)M.Sc. (Math) (Y.C.M.O.U)
३. शिवराज महाविद्यालय,परतूर, ता.परतूर, जि. जालना. (B.A./B.B.A./B.C.A.)M.Sc. (Math) (Y.C.M.O.U)
४. राजकुंवर महाविद्यालय,फर्दापूर,ता.सोयगांव, जि. औरंगाबाद. (B.A./B.Com/B.Sc.)M.Sc. (Math) (Y.C.M.O.U)
५. राजकुंवर महाविद्यालय,आजिंठा,ता.सिल्लोड,जि.औरंगाबाद. (B.Com.)
६. शिवराज महाविद्यालय,पिंपळगांव कोल्हते,ता.भोकरदन,जि.जालना.(B.A./B.Com/B.Sc.)

### कनिष्ठ महाविद्यालये

७. शिवराज कनिष्ठ महाविद्यालय,पिंपळगांव कोल्हते,ता.भोकरदन,जि.जालना. (11&12 ARTS / SCI.)
८. राजकुंवर उच्च माध्यमिक विद्यालय,जालना, जि.जालना. (ARTS/COMM./SCI)
९. राजकुंवर उच्च माध्यमिक विद्यालय,धावडा,ता.भोकरदन,जि.जालना. (ARTS /SCIENCE)
१०. राजकुंवर उच्च माध्यमिक विद्यालय,फर्दापूर,ता.सोयगांव,जि.जालना. (ARTS /COMM./SCI.)
११. राजकुंवर उच्च माध्यमिक विद्यालय,हिवरा (राळा),ता.बदनापूर,जि.जालना. (ARTS /COMM./SCI.)
१२. राजकुंवर उच्च माध्यमिक विद्यालय,राममुर्ती,ता.जि.जालना. (ARTS /COMM./SCI.)
१३. राजकुंवर उच्च माध्यमिक विद्यालय,परतूर,ता.परतूर,जि.जालना. (ARTS /COMM./SCI.)
१४. राजकुंवर उच्च माध्यमिक विद्यालय,सोमठाणा,ता.बदनापूर,जि.जालना. (ARTS /COMM./SCI.)
१५. राजकुंवर उच्च माध्यमिक विद्यालय,भोकरदन,ता.भोकरदन,जि.जालना. (ARTS /COMM./SCI.)

### माध्यमिक शाळा

१६. राजकुंवर माध्यमिक विद्यालय, धावडा, ता.भोकरदन, जि.जालना.
१७. राजकुंवर माध्यमिक विद्यालय, फर्दापूर, ता.सोयगांव, जि.औरंगाबाद.
१८. राजकुंवर माध्यमिक विद्यालय, हिवरा (राळा), ता.बदनापूर, जि.जालना
१९. राजकुंवर माध्यमिक विद्यालय, राममुर्ती,ता.जि.जालना.
२०. राजकुंवर माध्यमिक विद्यालय, सोमठाणा, ता.बदनापूर, जि.जालना.
२१. राजकुंवर माध्यमिक विद्यालय,भोकरदन,ता.भोकरदन,जि.जालना.

### प्राथमिक शाळा

२२. केंब्रीज प्राथमिक इंग्रजी शाळा, जालना, जि.जालना.
२३. महाराणा प्रताप प्राथमिक व उच्च प्राथमिक इंग्रजी शाळा,परतूर,ता.परतूर,जि.जालना.
२४. राजकुंवर प्राथमिक विद्यालय, जालना,जि.जालना.
२५. राजकुंवर प्राथमिक व उच्च प्राथमिक विद्यालय, धावडा,ता.भोकरदन,जि.जालना.
२६. राजकुंवर प्राथमिक विद्यालय, फर्दापूर, ता.सोयगांव, जि.औरंगाबाद.
२७. राजकुंवर प्राथमिक व उच्च प्राथमिक विद्यालय, भोकरदन,ता.भोकरदन,जि.जालना.

Scanned with CamScanner

Proposed Building




पिंपळगांव (कोलते ), ता. भोकरदन, जि.जालना मो. ९१४५८७३५२५,९४०४२६३२०४

Shubham, Jalna - 9923332363

Scanned with CamScanner